महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २९६ वे दिनांक : २४/१०/२०२६ वार : शनिवार

## पक्षचिन्ह घालून मतदानाचा आरोप; भाजप उमेदवार अडचणीत?



**पुणे** : राज्यातील विधान परिषदेच्या 5 जागांसाठी (शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ) आज सकाळपासून मतदान पार पडत आहे. या निवडणुकीत तब्बल १८२ उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. सकाळपासूनच 'स्पाय पेन' आणि ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपवरून राजकीय वातावरण तापलेले असतानाच, आता पुणे शिक्षक मतदारसंघातील एका नव्या वादामुळे निवडणुकीत आणखी भर पडली आहे. भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी गळ्यात पक्षाचे चिन्ह घालून मतदान केल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर, सुप्रिया सुळे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आचारसंहिता भंगाचा गंभीर आरोप करत निवडणूक आयोगाकडे कारवाईची मागणी केली आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातील भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांचा मतदान करतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये गावडे हे गळ्यात आपल्या पक्षाचे चिन्ह असलेले उपरणे घालून मतदान केंद्रात प्रवेश करताना आणि मतदान करताना दिसत आहेत. नियमानुसार मतदान केंद्राच्या आत कोणत्याही पक्षाचे चिन्ह, झेंडा किंवा प्रचार साहित्य नेण्यास सक्त मनाई असते. या प्रकारावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सदर व्हिडिओ शेअर करत त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. त्या म्हणाल्या, "मतदान केंद्रावर पक्षीय ओळख बाजूला ठेवून एक सामान्य मतदार म्हणून जाणे अपेक्षित असते. लोकशाहीच्या या पवित्र प्रक्रियेचे पावित्र्य आणि मतदान केंद्राची निष्पक्षता प्रत्येकाने जपली पाहिजे. उमेदवाराला पक्षाचे चिन्ह गळ्यात परिधान करून मतदान केंद्रावर प्रवेश कसा दिला? ही सवलत केवळ सत्ताधारी उमेदवारालाच का दिली जाते? हा थेट आदर्श आचारसंहितेचा भंग नाही का?" असा सवाल करत महाराष्ट्र शासन आणि निवडणूक आयोगाने यावर उत्तर द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.सुप्रिया सुळे यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर महाविकास आघाडीचे इतर नेतेही आक्रमक झाले आहेत. राष्ट्रवादीचे नेते (शरद पवार गट) जितेंद्र आव्हाड, मेहबूब शेख, तसेच शशिकांत शिंदे आणि काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ यांनीही या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. "सत्ताधाऱ्यांसाठी वेगळे आणि विरोधकांसाठी वेगळे नियम आहेत का?" असा प्रश्न उपस्थित करत या सर्व नेत्यांनी कौस्तुभ गावडे यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. नियमानुसार, कोणताही उमेदवार, राजकीय प्रतिनिधी किंवा सामान्य मतदार मतदान केंद्रात पक्षाचे चिन्ह, झेंडा, बॅच, पक्षाचे नाव किंवा बोधचिन्ह असलेली टोपी, मफलर (उपरणे) आणि प्रचार साहित्य घेऊन प्रवेश करू शकत नाही. मतदान प्रक्रियेचे पावित्र्य, निष्पक्षता आणि मतदानाची गुप्तता राखण्यासाठी हा नियम कठोरपणे लागू केला जातो. मतदान केंद्रात केवळ एक 'सामान्य मतदार' म्हणून जाणे अपेक्षित असते. या नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तीवर आदर्श आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल होऊन कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. याच नियमाचा आधार घेत आता महाविकास आघाडीने कारवाईची मागणी लावून धरली आहे.

## नौदलाच्या अग्निवीरांमुळे सागरी सुरक्षा भक्कम होणार



**मुंबई** : नौदलातील आपला कार्यकाळ पूर्ण करून परतलेल्या 250 हून अधिक 'अग्निवीरां'ना महाराष्ट्र पोलिसांच्या सागरी सुरक्षा दलात (कोस्टल पोलिस) सामावून घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या जवानांच्या कठोर प्रशिक्षण आणि अनुभवामुळे राज्याची सागरी सीमा अधिक सुरक्षित होण्यास मोठी मदत मिळणार असून, त्यांना पोलिस दलात सामावून घेण्यासाठी नियमांत आवश्यक बदल करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य सरकारने हा निर्णय घेतला होता की महाराष्ट्रातले जेवढे अग्निवीर हे आपला कार्यकाल संपवून परत येतील, त्यातील ज्या अग्निवीरांना महाराष्ट्र पोलिसमध्ये नोकरी करण्याची इच्छा आहे त्यांना आम्ही सामावून घेऊ. याचे कारण अतिशय कठोर अशी ट्रेनिंग घेतलेले हे जवान आहेत. यांनी सीमेवर देखील काम केले आहे. प्रचंड अशा प्रकारची क्षमता त्यांच्यात आहे. त्यामुळे इतके ट्रेन्ड लोकं पोलिसांच्या अतिशय कामाचे राहतील. आणि म्हणून आम्ही हा निर्णय घेतला. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, त्यामुळे पहिल्यांदा आमच्याकडे नौदलाची बॅच आलेली आहे. या नौदलाच्या बॅचमधले सगळे अग्निवीर हे आम्ही सामावून घेतले आहेत. या सगळ्यांना आपल्या कोस्टल पोलिसमध्ये घेतले आहे. उलट याचा आपल्याला असा फायदा झाला आहे की कोस्टल पोलिसमध्ये आपल्याला सातत्याने बिल्डिंग करणे गरजेचे होते, कारण त्या प्रकारचे ट्रेनिंग आपल्याकडे उपलब्ध नव्हते. कारण त्याची सुरुवात आता आपण केली होती. पण आता हे अडीचशे पेक्षा जास्त आमचे अग्निवीर हे कोस्टल पोलिसमध्ये आल्यामुळे आपली सागरी सीमा सुरक्षित करण्यासाठी एक अत्यंत ट्रेन्ड मॅनपॉवर आपल्याला मिळाले आहे. त्यामुळे नियमांमध्ये काही बदल करून आम्ही सगळ्यांना यात सामावून घेतला आहे. या भरतीसंदर्भात सांगताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ही सरळ भरती प्रक्रिया होती. यासाठी चाचणीमधून सूट दिलेली आहे. कारण अतिशय कठीण अशी चाचणी करून ते सेनेत गेले आहेत. त्यामुळे आता त्यांना चाचणीची आवश्यकता नाही. त्यामुळे थेट त्यांना ऑर्डर देण्यात आले आहेत.

## "आम्ही प्रतापसिंह पाटलांसोबतच"; सत्तारांचा जरांगेंना टोला

**छत्रपती संभाजीनगर** : पालकमंत्री संजय शिरसाट यांनी पदवीधर मतदारसंघात सतीश चव्हाण यांना पाठिंबा नसल्याची सुरुवात केली. मग यानंतर आम्ही राजकारणी आमच्या पद्धतीने कामाला लागलो असून, प्रतापसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी कन्नड, वैजापूर, सिल्लोड, खुलताबाद आणि छत्रपती संभाजीनगर शहरात फिरलो आहोत. त्यानंतर जर आपली भूमिका बदलली, तर पक्षाची प्रतिमा मलिन होते. पक्षाबाबत धोरणात्मक निर्णय घेतला की त्यावर ठाम राहावे लागते. आपण रोज शब्द बदलला, तर आपल्या शब्दाला किंमत राहत नाही आणि एकदा बोलण्याची किंमत संपली की लोक दुसऱ्यांदा विश्वास ठेवत नाहीत. म्हणूनच आम्ही प्रतापसिंह पाटील यांच्यासोबत आहोत आणि 27 तारखेला गुलाल अंगावर घेण्यासाठी सुद्धा जाणार आहोत, असे शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनी म्हटले आहे. अब्दुल सत्तार म्हणाले की, मराठवाडा पदवीधर मतदारसंघात तुल्यबळ लढत होत असून, सकाळपासून होत असलेल्या मतदान प्रक्रियेतून ते दिसून येत आहे. जसे जसे मतदान पुढे जाईल, तसे मतप्रवाह आणि चर्चा समोर आल्यावर अंदाज बांधता येईल. मात्र, मतदार ज्या पद्धतीने गुप्तपणे मतदान करत आहेत, ते पाहता बदल निश्चित होईल असे वाटते. मनोज जरांगे पाटील यांनी ऐकवलेल्या क्लिपविषयी बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांनी ऐकवलेली क्लिप ही एआयमार्फत तयार करण्यात आली आहे. यात काही राजकारण असून, त्याची उच्चस्तरीय चौकशी होईल. त्यांना ही क्लिप कोणी आणून दिली, कशा पद्धतीने, कोणी आणि कशामुळे दिली, तसेच ही क्लिप दाखवण्यामागची पार्श्वभूमी काय होती, याची सखोल चौकशी केली जाईल. चौकशी झाल्यानंतर दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, हा एक बिनबुडाचा आरोप आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ ऑक्टोबर २०२६


## कलदेव निंबाळा येथे पशूसेवा संकल्प अभियान



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील कलदेव निंबाळा येथे पशूवैद्यकीय चिकित्सालय बलसूर यांच्या वतीने पशूसेवा संकल्प अभियानाची नुकतीच सुरवात करण्यात आली.यावेळी ग्रामपंचायत गटनेत्या सुनीता देविदास पावशेरे यांच्या उपस्थितीत अभियानाला सुरुवात करण्यात आली. सर्व पशु,जनावरांना विशिष्ट पितळी बॅच /टॅग बिल्ले लावण्याची सुरुवात करून ऑनलाइन नोंदणी करण्यातआली.सध्या दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे चारा साक्षरता अभियान अंतर्गत निकृष्ट चारा सकस करणे,पर्यायी चारा व्यवस्थापन, पूरक आहार, मुरघास निर्मिती, जनावरे गोठा व्यवस्थापन, कृषी जन विमा योजना, किसान क्रेडिट कार्ड ,आजचा चारा व्यवस्थापन उद्या सुरक्षित पशुधन आदी बाबीवर पशुधन पर्यवेक्षक सौरभ राठोड यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून सविस्तर माहिती दिली.यावेळी ग्रामपंचायत गटनेत्या सुनिता पावशेरे, यांच्यासह दिगंबर घंटे, अप्पाराव यलुरे, दिलीप बलसुरे,किसन डिगुळे, श्रीशैल जकेकुरे,प्रकाश पावशेरे, राम बलसुरे,रवींद्र ढोणे, प्रविन गायकवाड,साळुंखे, सहाय्यक आदी पशूपालक,शेतकरी उपस्थित होते.यावेळी ग्रामपंचायत गटनेत्या सुनीता पावशेरे म्हणाल्या की "पशुसेवा अभियान हा पशुपालकांसाठी उपयुक्त उपक्रम आहे. मात्र, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा, पाणी आणि शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.पशुपालकांच्या हितासाठी व संरक्षणासाठी आम्ही योग्य ते सहकार्य करु." असे सांगून प्रशासनाची लागेल ती मदत घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

## इकरा पब्लिक स्कूलमध्ये १००% उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांचा अनोख्या पद्धतीने सत्कार



**जळगाव :** शालेय जीवनात शिस्त, नियमितता आणि वेळेचे महत्त्व अनन्यसाधारण असते. याचे महत्त्व ओळखून इकरा पब्लिक स्कूल, मोहाडी, जळगाव येथे विद्यार्थ्यांमध्ये नियमित उपस्थितीची सवय निर्माण करण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. जून ते ऑक्टोबर या कालावधीत १०० टक्के उपस्थिती नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ पदक किंवा प्रमाणपत्र न देता बक्षीस म्हणून कथा-पुस्तके भेट देण्यात आली. वाचनाची आवड वाढावी, विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण व्हावी आणि अनुपस्थितीचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. नियमित उपस्थिती राखणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून इतर विद्यार्थ्यांनाही त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले.याप्रसंगी मुख्याध्यापकांनी सांगितले की, "शिक्षण प्रक्रियेत वर्गातील उपस्थिती ही यशाची पहिली पायरी आहे. मुलांनी आनंदाने शाळेत यावे, त्यांना वाचनाची गोडी लागावी आणि शाळेशी त्यांचे भावनिक नाते दृढ व्हावे, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांचे कौतुक केल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वाढतो आणि शिक्षक व विद्यार्थ्यांमधील मैत्रीपूर्ण नाते अधिक दृढ होते."शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे पालकांनीही स्वागत केले.कथा-पुस्तकांच्या भेटीमुळे विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळेल, तसेच भविष्यात इतर विद्यार्थीही नियमित उपस्थिती राखण्यासाठी प्रोत्साहित होतील, असा विश्वास पालकांनी व्यक्त केला.उपस्थितीचा विक्रम, वाचनाची प्रेरणा आणि शिस्तीचा संस्कार या त्रिसूत्रीवर आधारित इकरा पब्लिक स्कूलचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## आंध्र, कर्नाटक, तेलंगणातून तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येतात भाविक




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राष्ट्रीय महामार्गावर येणेगूरजवळ बापूराव पाटील मित्र मंडळ व मुरूम शहर व्यापारी यांच्या संयुक्त विद्यमाने दसरा ते कोजागरी पौर्णिमेदरम्यान तुळजापूरला दर्शनासाठी पायी चालत जाणाऱ्या भाविकांसाठी बुधवारपासून (दि.21) अन्नदान सुरू करण्यात आले आहे. दरवर्षी नवरात्रोत्सवात शेजारील कर्नाटक, तेलंगणा राज्यातून तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. या भाविकांच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. राष्ट्रीय महामार्गावर येणेगूर गावाजवळ बापूराव पाटील मित्र मंडळ व मुरूम शहर व्यापारी यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नदान करण्यात येत आहे. बुधवारी (दि.21) सायंकाळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा मुरूमचे नगराध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते श्री तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून अन्नदान सुरू करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, व्यंकट जाधव, बाबासाहेब बिराजदार, गोविंद पाटील, धनराज टिकांबरे, सुजित शेळके आदींची उपस्थिती होती. कोजागरी पौर्णिमेनिमित्त तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी शेजारच्या कर्नाटक, आंध्र, तेलंगणा राज्यातून पायी चालत येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. अशा भाविकांप्रती आदर व्यक्त करण्यासह त्यांना जेवण मिळावे, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.२५ वर्षापासूनची परंपरा, बापूराव पाटील मित्र मंडळाचा उपक्रमजेवणात बुंदी, चपाती, ज्वारीची भाकरी बापुराव पाटील मित्र मंडळ व मुरूम शहर व्यापारी यांच्याकडून मागील २५ वर्षांपासून सुरू झालेली परंपरा आजतागायत अखंडपणे सुरू आहे. यासाठी बालाप्रसाद काबरा, उमेश कारभारी, विलास वाडीकर, दत्ता कुंभार आदी मंडळी दिवसरात्र पुढाकार घेतात. अन्नदानाच्या माध्यमातून याठिकाणी बुंदी, चपाती, ज्वारीची भाकरी, बटाट्याची पातळ भाजी, बेसन, भात असे पूर्ण जेवण देण्यात येते. मार्गावर ठिकठिकाणी केवळ भात वरण वाटप करण्यात येते. मात्र येथे पूर्ण जेवण देण्यात येत असल्याने याठिकाणी महाप्रसाद घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी असते.शरण पाटील फाउंडेशन कडून थंड पाण्याची सोय, श्री माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी कडून औषधे वाटप युवा नेते शरण पाटील यांच्या वतीने शरण पाटील फाउंडेशन कडून याठिकाणी भाविकांसाठी पिण्याच्या थंड पाण्याची सोय करण्यात आली होती. याबरोबरच श्री माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मशीच्या वतीने पायी जाणाऱ्या भाविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचाराची सोय करण्यात आली होती. यावेळी सर्दी, ताप, अंगदुखी यासह विविध आजारावर औषधे वाटप करण्यात आले.


## १० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

# D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# 'माती बोलते तेव्हा...'




कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर... हा केवळ तालुका नाही, तर इतिहास, अध्यात्म, समाजकारण आणि संस्कृतीचा एक अनोखा संगम आहे. संतांची, शूरांची आणि साहित्यिकांची भूमी आहे.या समृद्ध साहित्यिक परंपरेच्या मातीत 'तिफण' रुजले. एका छोट्याशा कल्पनेतून सुरू झालेला तिफण कविता महोत्सव आज हक्काचे व्यासपीठ झाले आहे. कन्नडच्या मातीतले कवी, लेखक आज राज्यभर ओळखले जातात. याचं सगळं श्रेय आपल्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांना आहे. आनंदाची बाब म्हणजे, यावर्षी हा कविता महोत्सव ९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या प्रवासात अनेक कवी - लेखक - वाचक घडले, हे आपले मोठे यश आहे.कन्नडमध्ये गेल्या काही वर्षात साहित्याची एक छोटीशी चळवळ उभी राहिली आहे. छोट्या-मोठ्या साहित्य बैठका, लेखनावर चर्चा, नव्या पुस्तकांवर संवाद, पुस्तक प्रकाशने, कविसंमेलने हे सातत्याने सुरू आहेत.याचाच एक भाग म्हणून मागील वर्षापासून आम्ही एक नवा उपक्रम सुरू केला - 'तिफण स्नेहमेळावा' दीपावलीच्या पावन पर्वावर, बलिप्रतिपदेच्या पार्श्वभूमीवर - आम्ही कन्नड तालुक्यातील साहित्यिक, पत्रकार आणि शेतकरी एकत्र येतो. एखाद्या बंद हॉलमध्ये नाही, तर थेट शेतकऱ्याच्या बांधावर, गावाशिवारात.तिथे साहित्यावर संवाद होतो, वर्तमान प्रश्नांवर मंथन होते आणि पुढील साहित्यिक वाटचालीची दिशा ठरते.मागील वर्षी आमची थीम होती - 'चला कवितेच्या गावा जाऊ'यावर्षी परिस्थिती वेगळी आहे. यावर्षी दुष्काळ आहे. शेतकरी संकटात आहे. शिवार भेगाळले आहे. अशा वेळी उत्सवापेक्षा, माणुसकी जपणे महत्त्वाचे.म्हणून यावर्षी आम्ही स्नेहमेळावा अतिशय साधेपणाने, पण अधिक संवेदनशीलतेने आयोजित करत आहोत.यावर्षीची थीम आहे - 'माती बोलते तेव्हा...'जेव्हा माती बोलते, तेव्हा त्यात कवीचा हुंदका असतो, शेतकऱ्याचे अश्रू असतात आणि बळीराजाची आशाही असते. याच मातीचा आवाज ऐकण्यासाठी आम्ही पुन्हा बांधावर जातो आहोत.या मेळाव्यात आम्ही आमच्या शेतकरी बांधवाला सांगणार आहोत - "आम्ही तुमच्या सोबत आहोत. तुमचे दु:ख हे आमचे दु:ख आहे. हा बांधिलकीचा मेळावा आहे."लवकरच गावाचे नाव, शिवाराचे ठिकाण आणि तारीख आम्ही जाहीर करू.कन्नड तालुक्यातील सर्व साहित्य प्रेमी, वाचक, पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी आणि शेतकरी बांधवांनी या सृजन सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, ही विनम्र विनंती.चला, मातीचे बोलणे ऐकूया!

**डॉ. शिवाजी हुसे**
**तिफण वाचक चळवळ**

# डॉ. इं. भा. महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सन्मान सप्ताह आणि वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभाग व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘अभिजात मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व वाचनाचे महत्त्व’ या विषयावर व्याख्यानाचे व निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले होते. डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल होत्या. व्यासपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. रवींद्र परभाने, मराठी विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी देव-निमकर, डॉ. प्रेमला मुखेडकर आणि ग्रंथपाल प्रा. ज्योत्स्ना जावळे यांची उपस्थिती होती.डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानातून भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. व्यक्तिमत्त्व विकास, ज्ञानप्राप्ती आणि यशस्वी जीवनासाठी वाचनाचे महत्त्व विशद करताना त्यांनी अभिजात मराठी भाषेतील साहित्याचे नियमित वाचन करण्याचे आवाहन केले. वाचनामुळे विचारांना दिशा मिळते, ज्ञानाच्या कक्षा विस्तारतात आणि व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल यांनी विद्यार्थिनींनी आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यासाठी नियमित वाचन आणि लेखनाची सवय जोपासावी, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ज्योत्स्ना जावळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांनी केले.वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित निबंधलेखन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना पुस्तके भेट देऊन गौरविण्यात आले.कनिष्ठ महाविद्यालय गट : प्रथम क्रमांक धनश्री माने, द्वितीय क्रमांक सानिका भुईगळ आणि तृतीय क्रमांक अंकिता खंडाळे.वरिष्ठ महाविद्यालय गट : प्रथम क्रमांक मेघा वाघमारे, द्वितीय क्रमांक सपनाराणी मलिक आणि तृतीय क्रमांक आराधना गायकवाड.कार्यक्रमासाठी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांनी बजावला मतदानाचा हक्क



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आज मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकी निमित्त मुरूम ता. उमरगा जिल्हा धाराशिव येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांनी मतदानाचा हक्क बजावला.यावेळी धाराशिव जिल्हा बँकेचे चेअरमन तथा मुरूमचे नगराध्यक्ष श्री. बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन श्री. शरण पाटील,यांनीही मतदानाचा हक्क बजावला.त्याच्या सोबत उपनगराध्यक्ष श्री. रमेश चव्हाण, श्री. अमर भोसगे, पंचायत समितीचे माजी सभापती श्री. सचिन पाटील, श्री. सुजित शेळके, श्री. राजू मुल्ला, श्री. सदानंद पाटील, श्री. संजू पाटील, श्री. राजू माने, श्री. उल्हास घुरघुरे, श्री. महालिंग बाबशेट्टी, श्री. पिंटू राठोड यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.

# संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेची विभागावर दमदार कामगिरी



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेचे विद्यार्थी बीड येथे विभाग स्तरावर झालेल्या विभाग स्तरीय योग स्पर्धेत नंदिनी सिंगारे व प्रियका खिल्लारे या जोडीने आर्टिस्टिक योगामध्ये तर प्रतिज्ञा डूडवे हिने पारंपारिक योगात तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री शशिकांत दाभाडे, संस्थेचे सचिव श्री निवृत्ती पाटील गावंडे, क्रीडा शिक्षक श्री बळीराम मुरमे, यांनी योगशिक्षक श्री रमेश डकले तथा यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ ऑक्टोबर २०२६


## पुन्हा उजाडलंच नाही

माय आम्हाला सोडून
तू गेली देवाघरी
त्या रात्री नंतर
पुन्हा उजाडलंच नाही
उभ्या जिंदगाणीवर पडला
भयाण काळोख..

तू गेल्या नंतर माय
आलंय वाट्याला
आयुष्यभराच पोरकंपण
कधी न सरणारं..

माय..
उन्हं तशीच आहे आज ही
जीवाची होरपळ करणारी
पण तुझी सावली हरवली
अन् मी उन्हात पडलो..

आता मनातलं वादळ
अन् डोळ्यातला पाऊस
नाव घेत नाही थांबण्याचं..

जीव थकलाय आताशा
काळजावरच्या जखमा
वाढत चालल्याने..

पण मायेचा हात राहिला नाही
थकलेल्या जीवाला
पुन्हा उभारी देणारा..

माय
खरं तर हुकलं गणित
तुझ्या विन जगण्याचं
तरी ही जगतोच आहे
तू सांगून गेलीस
हार मानायची नाही म्हणून..



ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

## कुठे गेले रे पळून ?

पावसाविना शेत माझे,
उभ्या उभ्याने जळाले.
नभातील ढग सारे,
सांगा कुठे रे पळाले ? १

मेघराजा तुझ्याविना
शेतशिवार ओस पडले.
कोरडा दुष्काळ पाहून,
मायबाप खूप रडले. २

पावसाविना शेतामध्ये,
काय करावे कळेना,
हाल पाहुनी मातीचे,
मन कुठेच वळेना. ३

आता येऊन मेघराजा,
काळया मातीस तारावे.
बळीराजाच्या दुःखाला,
दूर कायमचे सारावे. ४

असा वागू नको तू निष्ठुर,
बळीराजाचे बळी जाई.
बळीराजास तारण्यास,
आता करावे तू घाई. ५

भागविण्यास तहान
मेघराजा लवकर यावे.
तहानलेल्या धरणीला,
पुन्हा संजीवनी द्यावे. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. नं. ९७६३२८३७०४**

# जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना मदत करणे ही समाजोपयोगी कृती : संजय खंबायते



**कन्नड (अरुण थोरात) :** ग्रामीण भागातील गोरगरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे ही खऱ्या अर्थाने समाजोपयोगी कृती आहे. जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी रामराज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रामाभाऊ मुळे यांनी सुरू केलेला उपक्रम कौतुकास्पद असून, अशा सामाजिक कार्यातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला बळ मिळेल, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी केले.रामाभाऊ मुळे यांच्या वाढदिवसानिमित्त कन्नड तालुक्यातील अंधानेर येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात खंबायते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक राजीव जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, डॉ. दिलीपसिंग राजपूत, रामराज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रामाभाऊ मुळे, नगरसेवक सुनील पवार उपस्थित होते.जिल्हा परिषद शाळांना समृद्ध परंपरा लाभली असून, या शाळांनी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देत देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीत योगदान देणारी व्यक्तिमत्त्वे घडवली आहेत. या शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता आहे. त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते निश्चितच यशाची उंची गाठू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन खंबायते यांनी केले.यावेळी डॉ. दिलीपसिंग राजपूत यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे हा केवळ मदतीचा उपक्रम नसून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली गुंतवणूक असल्याचे मत व्यक्त केले. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन शिक्षणाविषयीची आवड वाढण्यास मदत होते, असेही त्यांनी नमूद केले.रामाभाऊ मुळे यांनी जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा आणि गुणवत्ता असून, त्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे मनोबल वाढविणेही महत्त्वाचे आहे. याच भावनेतून शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम सुरू केला असून, आगामी काळात राज्यभरातील जिल्हा परिषद शाळा आणि विद्यार्थ्यांसाठी समर्पित भावनेने कार्य करणार असल्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय केवट यांनी केले. यावेळी केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मोतीयाळे, प्रशालेतील शिक्षक नारायण दांगट, दिपक सोनवणे, रामभाऊ गुढेकर रामभाऊ गुढेकर, सुयश अहिरराव, दीपक मीनाक्षी बडग, आरती बागुल, श्रीमती महाजन, अशपाक शेख यांच्यासह रामराज्य ग्रुपचे सदस्य, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रशांत वाघ यांनी मानले.






# शरणापूरच्या श्री साईबाबा मंदिराचा १५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** 'मिनी शिर्डी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या शरणापूर येथील श्री साईबाबा मंदिराचा १५ वा वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री श्री १००८ परमानंदगिरीजी महाराज, राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ आणि प्रसिद्ध वास्तुतज्ज्ञ व ज्योतिर्विद आनंद पिंपळकर गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.वर्धापन दिनानिमित्त संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांच्या हस्ते साईबाबांचा महाअभिषेक व विधिवत पूजा करण्यात आली. मुख्य कार्यक्रमात मान्यवरांनी मंदिर संस्थानच्या गेल्या १५ वर्षांतील सामाजिक कार्याचे कौतुक केले. यावेळी वास्तुशास्त्र व ज्योतिषशास्त्रावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मंदिराच्या सामाजिक उपक्रमांची आणि आगामी विकासकामांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमानंतर आयोजित महाप्रसादाचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला.यावेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी साईभक्त मित्र मंडळ आणि साई पालखी समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ ऑक्टोबर २०२६


## जिंतूर विधानसभा मतदारसंघात पदवीधर मतदार याद्या मध्ये गोंधळ

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** विधानसभा मतदारसंघांमध्ये आज पदवीधर मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया सुरू असताना अनेक मतदारांचे नाव चुकीचे व काहींचे तर दुसऱ्याच जिल्ह्यामध्ये बुथ असल्याचे निदर्शनास आले आहे.याबाबत आमच्या प्रतिनिधींनी जिंतूर मतदार संघातील बुथ वर पाहणी केली असता बऱ्याच मतदार संघाचे जिंतूर रहिवाशी असून देखील त्यांना परतुर किंवा काहींना मुदखेड तर काहींना आणखीन दुसरेच बाहेर जिल्ह्यांचे बुथ वर मतदान असल्याचे मेसेज वर लेखी कळविले असल्याचे दिसून आले.याबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीशी उमेदवारांच्या प्रतिनिधीशी चर्चा केल्यानंतर त्यांनाही याबाबत कुठलीही कल्पना नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आमच्या मतदार यादी मध्ये जे नाव आहे त्याबाबत आम्ही मतदारांना योग्य ते मार्गदर्शन करू शकतो परंतु काही चुकीचे आहे का हे आम्हाला काहीही माहित नाही असे ही सांगण्यात आले.तर अनेक मतदार आल्या पावली परत जात असल्याचे दिसून आले व त्यांच्यात असंतोष यांची भावना दिसून येत होती आम्ही मतदार असून देखील हे काय मुद्दामच असे केले की काय अशी चर्चा ही मतदारांमध्ये दिसून आली.याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही.अनेक मतदारांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलून दाखवली की या पदवीधर मतदारसंघांमध्ये जर अशा प्रकारच्या या मतदार याद्यांमध्ये जर घोळ होत असतील तर मतदान घेण्याला अर्थच काय आम्ही आमचे काम सोडून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी बुथवर आलो परंतु इथे वेगळी चित्र पाहायला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.तर काहींचे असे म्हणणे आले की आम्ही ज्या वेळेस पदवीधर मतदार यांची नोंदणी केली त्यावेळेस आमच्याकडील आधार कार्ड ,रहिवासी पुरावा आमची संपूर्ण नाव सहित डिटेल मध्ये घेण्यात आले परंतु आमच्या यादीमध्ये आडनाव बदलले आहे व आम्ही मूळ प्रॉपर जिंतूर चे रहिवाशी असून देखील आम्हाला परतूरला तर काहींचे म्हणणे आम्हाला मुदखेडला बुथ देण्यात आले आहे. दुसऱ्याच जिल्ह्यामध्ये बुथ असल्याचे सांगण्यात आले.याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी काय निर्णय घेणार आता तर मतदान संपले आहे अशीही बोलकी प्रतिक्रिया ऐकायला मिळाली.

## उगवत्या क्रिकेटपटू वैष्णवी हजारीला वाढदिवसाच्या शुभेच्छा



**छत्रपती संभाजीनगर :** किज कैमरीज शाळेतील ८ वर्षीय कु. वैष्णवी राहुल हजारी हिला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा ! क्रिकेटच्या मैदानावर आपल्या जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर वैष्णवीने यशाची नवी शिखरे गाठावीत, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाची चमक दाखवावी आणि शाळेसह कुटुंबाचे नाव अभिमानाने उंचवावे, हिच १३ व्या वाढदिवसा निमित्त मनःपूर्वक सदिच्छा !तुझ्या उज्ज्वल भविष्यासाठी खुप साऱ्या शुभेच्छा !वैष्णवीबेटा

## जिंतूरला रेल्वे झालीच पाहिजे! पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांना निवेदन

**जिंतूर (बि. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्याच्या विकासासाठी आणि व्यापार वाढीसाठी जिंतूरला रेल्वे मार्गाशी जोडणे अत्यंत गरजेचे असून, या मागणीचा श्रीगणेशा परभणी जिल्ह्याचे लोकनेते रामप्रसाद बोर्डीकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मागणीचा प्रारंभ करण्यात आला जिंतूर तालुक्याला आजवर कधीही पालकमंत्री पदाचा मान मिळाला नव्हता. प्रथमच जिंतूर तालुक्याला मा. नामदार सौ. मेघना दीदी बोर्डीकर यांच्या रूपाने पालकमंत्री लाभले आहेत. या संधीचा फायदा घेत आज भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी, परभणी जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रदीप कोकडवार व समस्त जिंतूरकर नागरिकांच्या वतीने पालकमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले.या निवेदनात ३ प्रस्तावित रेल्वे मार्ग सुचविण्यात आले आहेत :१) परभणी व्हाया जिंतूर - लोणार - बुलढाणा२) परभणी - जिंतूर - वाशिम३) मानवत रोड - वालूर - जिंतूर - औंढा नागनाथ - हिंगोलीयापैकी कोणताही एक मार्ग मंजूर झाल्यास जिंतूरसह संपूर्ण परभणी जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. जागतिक पर्यटन क्षेत्र असलेले श्री क्षेत्र नेमगिरी संस्थान (श्री नेमिनाथ भगवान) जिंतूर येथे असल्याने दरवर्षी हजारो भाविक येथे येतात, मात्र रेल्वे नसल्याने त्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो.रेल्वे झाल्यास व्यापार वाढेल, पर्यटन वाढेल आणि शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व भाविकांना मोठा दिलासा मिळेल.यावर पालकमंत्री सौ. मेघना दीदी बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, या बाबत आवश्यक ती संपूर्ण माहिती घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करू असे आश्वासन दिले.यावेळी जिल्हा भाजपा मंत्री डॉ पंडित दराडे जिंतूर, न प अध्यक्ष प्रतापराव देशमुख ,भाजपा ता अध्यक्ष गोविंद थिटे, शहर अध्यक्ष विलास भांडारी, तोषनिवाल, दायमा ,सुनिल भोंबे, भाजपा व्यापारी आघाडीचे पदाधिकारी व जिंतूरकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## लग्नास नकार दिल्याने प्रेयसीचा खून




**मुंबई :** नवी मुंबईतून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या चार वर्षांपासून प्रेमसंबंध असलेल्या एका जोडप्यात वाद झाल्याने संतापलेल्या प्रियकराने आपल्या प्रेयसीची चाकूने भोसकून निर्घृण हत्या केली आहे. या गंभीर घटनेनंतर नेरुळ पोलिसांनी तत्परता दाखवत पळून गेलेल्या आरोपीला अवघ्या काही तासांतच अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सादिया जाकीर शेख असे मृत तरुणीचे नाव असून ती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ग्राउंड स्टाफ म्हणून कार्यरत होती. सादिया आणि तिचा प्रियकर दानिश मोहम्मद अन्सारी (वय 27) हे दोघेही मुंबईतील वडाळा येथील अँटॉप हिल परिसरात राहायला होते. 20 तारखेला सकाळी पावणे सातच्या सुमारास सादिया नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी नेरुळ रेल्वे स्थानकाबाहेरील बस स्टॉपवर उभी असताना, दानिशने तिथे येऊन अचानक तिच्यावर चाकूने प्राणघातक हल्ला केला आणि घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच नेरुळ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सादियाला सुरुवातीला वाशी येथील महापालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने पुढील उपचारांसाठी तिला मुंबईतील सायन रुग्णालयात हलवण्यात आले. दुर्दैवाने, तिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात या जघन्य हत्येमागचे कारण उघड झाले आहे. सादिया आणि दानिश यांचे गेल्या चार वर्षांपासून प्रेमसंबंध होते आणि त्यांनी भविष्यात लग्नाचा निर्णयही घेतला होता. मात्र, अलीकडे सादिया त्याला लग्नास नकार देत होती. तसेच, तिचे दुसऱ्या तरुणासोबत संबंध असल्याचा संशय दानिशला होता. याच संशयातून आणि रागातून मागील वर्षभरापासून त्यांच्यात सतत वाद होत होते, ज्यातून दानिशने हे क्रूर पाऊल उचलले. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून नेरुळ पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी तात्काळ दोन विशेष पथके स्थापन केली. एका पथकाने वडाळा येथील त्याच्या घरी शोध घेतला, तर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दुसरे पथक घणसोलीला रवाना झाले. आरोपी दानिश घणसोली येथे त्याच्या बहिणीच्या घरी लपून बसल्याची पक्की माहिती मिळताच, पोलिसांनी सापळा रचून त्याला बेड्या ठोकल्या. त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने 28 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली असून पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ ऑक्टोबर २०२६


# संयुक्त राष्ट्र दिन : शांततामय आणि समताधिष्ठित विश्वनिर्मितीचा संकल्प

दरवर्षी २४ ऑक्टोबर हा दिवस जगभरात ‘संयुक्त राष्ट्र दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचे स्मरण करून देणारा नसून, संपूर्ण मानवजातीने शांतता, सहकार्य, समानता, न्याय आणि मानवी प्रतिष्ठा यांसाठी स्वीकारलेल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. जगातील विविध राष्ट्रांच्या भाषा, संस्कृती, धर्म, राजकीय व्यवस्था आणि आर्थिक परिस्थिती वेगवेगळी असली, तरी युद्ध, दारिद्र्य, भूक, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि सामाजिक विषमता यांसारखे प्रश्न संपूर्ण मानवजातीसमोर आव्हान निर्माण करतात. या समस्यांचे परिणाम कोणत्याही एका देशापुरते मर्यादित राहत नाहीत. त्यामुळे जागतिक प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रांमध्ये संवाद, परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना असणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि भयमुक्त जीवन जगता यावे, तसेच राष्ट्रांमधील संघर्षांचे निराकरण शांततापूर्ण मार्गाने व्हावे, या व्यापक उद्देशातून संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती झाली. म्हणूनच संयुक्त राष्ट्र दिन हा जागतिक ऐक्याचा संकल्प दृढ करण्याचा आणि मानवतेसमोरील प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे.विसाव्या शतकातील दोन महायुद्धांनी जगाला मानवी विनाशाची भीषण अनुभूती दिली. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय शांतता टिकविण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली; मात्र दुसऱ्या महायुद्धाला रोखण्यात त्याला यश आले नाही. १९३९ ते १९४५ या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धात कोट्यवधी लोकांना प्राण गमवावे लागले. अनेक शहरे उद्ध्वस्त झाली, अर्थव्यवस्था कोलमडल्या आणि असंख्य कुटुंबे विस्थापित झाली. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्यांनी विज्ञानाच्या प्रगतीचा विनाशकारी वापर किती भयानक ठरू शकतो, हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. युद्धामुळे निर्माण होणारा द्वेष, असुरक्षितता आणि मानवी हक्कांचा ऱ्हास यांचा परिणाम अनेक पिढ्यांवर होतो, याची जाणीव जगाला झाली. राष्ट्रांमधील मतभेद केवळ शस्त्रांच्या बळावर सोडविण्याचा प्रयत्न केल्यास विनाश वाढतो; त्याऐवजी संवाद, मध्यस्थी, आंतरराष्ट्रीय कायदा आणि परस्पर सहकार्य यांना प्राधान्य दिले पाहिजे, हा विचार अधिक दृढ झाला. याच ऐतिहासिक पार्श्वभूमीवर जागतिक शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी अधिक व्यापक व प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले.संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना ही या प्रयत्नांचा ऐतिहासिक परिणाम होता. १९४५ मध्ये सॅन फ्रान्सिस्को येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत संयुक्त राष्ट्रांची सनद तयार करण्यात आली. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी आवश्यक अटी पूर्ण झाल्यानंतर ही सनद अंमलात आली आणि संयुक्त राष्ट्र संघटना अधिकृतपणे अस्तित्वात आली. त्यामुळे दरवर्षी २४ ऑक्टोबर हा संयुक्त राष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. या संघटनेच्या सनदेत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे, राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे, आर्थिक व सामाजिक समस्यांवर सहकार्य वाढविणे आणि मानवी हक्कांविषयी आदर प्रस्थापित करणे ही प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांची स्थापना म्हणजे युद्धाने उद्ध्वस्त झालेल्या जगाने शांततापूर्ण भविष्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. राष्ट्रांनी आपापले मतभेद बाजूला ठेवून जागतिक कल्याणासाठी एकत्र येण्याची आवश्यकता या संघटनेने अधोरेखित केली. तथापि, संघटनेच्या स्थापनेनंतरही जगात अनेक युद्धे आणि संघर्ष झाले. यावरून शांततेसाठी केवळ संघटना स्थापन करणे पुरेसे नसून तिच्या उद्दिष्टांप्रती राष्ट्रांची प्रामाणिक बांधिलकीही आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.आज संयुक्त राष्ट्र संघटना ही जगातील जवळजवळ सर्व स्वतंत्र राष्ट्रांना एकत्र आणणारी व्यापक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. तिच्या महासभेत प्रत्येक सदस्य राष्ट्राला प्रतिनिधित्व मिळते आणि जागतिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडण्याची संधी उपलब्ध होते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याची विशेष जबाबदारी सुरक्षा परिषदेवर आहे. मात्र, सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्यांना असलेल्या नकाराधिकारामुळे अनेक महत्त्वाच्या निर्णयांवर मोठ्या राष्ट्रांच्या राजकीय हितसंबंधांचा प्रभाव पडतो. त्यामुळे या व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी सातत्याने केली जाते. विकसनशील राष्ट्रांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे, निर्णयप्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर अधिक न्याय्य पद्धतीने निर्णय घेतले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. या मर्यादा असूनही संयुक्त राष्ट्र संघटना विविध देशांना संवादासाठी एक समान व्यासपीठ उपलब्ध करून देते. राष्ट्रांमध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु मतभेदांचे रूपांतर हिंसाचारात होऊ न देता त्यावर शांततापूर्ण मार्ग शोधणे, हे आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.जागतिक शांतता हा संयुक्त राष्ट्रांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. आजही जगातील अनेक भागांत युद्धे, सीमावाद, गृहसंघर्ष, दहशतवाद आणि राजकीय अस्थिरता यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन संकटात सापडले आहे. युद्धाचा परिणाम केवळ रणांगणावर लढणाऱ्या सैनिकांपुरता मर्यादित राहत नाही. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि सामान्य नागरिकांना त्याची मोठी किंमत मोजावी लागते. घरे, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा व्यवस्था आणि रोजगाराची साधने उद्ध्वस्त झाल्यामुळे समाजाची विकासप्रक्रिया खंडित होते. लाखो लोकांना आपली जन्मभूमी सोडून विस्थापित किंवा निर्वासित म्हणून जगावे लागते. अशा परिस्थितीत युद्धविरामासाठी प्रयत्न करणे, वाटाघाटींना प्रोत्साहन देणे, संघर्षग्रस्त भागांत मानवतावादी मदत पोहोचविणे आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य घडवून आणणे, ही संयुक्त राष्ट्रांची महत्त्वाची कार्ये आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये विविध देशांचे सैनिक, पोलीस आणि नागरी तज्ज्ञ सहभागी होतात. या मोहिमांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असला, तरी संघर्षग्रस्त प्रदेशांत स्थैर्य निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. खरी शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला भयमुक्त आणि सन्मानपूर्ण जीवन जगता येणे होय.मानवी हक्कांचे संरक्षण हे संयुक्त राष्ट्रांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा स्वीकारला. प्रत्येक व्यक्तीला जन्मतः प्रतिष्ठा आणि समान हक्क प्राप्त आहेत, ही या जाहीरनाम्याची मध्यवर्ती भूमिका आहे. जीवनाचा अधिकार, स्वातंत्र्य, सुरक्षितता, शिक्षण, काम, अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि भेदभावापासून संरक्षण यांसारख्या हक्कांना त्यात महत्त्व देण्यात आले. जात, धर्म, वंश, भाषा, लिंग किंवा सामाजिक स्थितीच्या आधारे व्यक्तीशी भेदभाव होऊ नये, हा आधुनिक मानवी हक्कविचाराचा मूलभूत आधार आहे. तथापि, आजही अनेक समाजांमध्ये जातीय भेदभाव, वर्णद्वेष, स्त्री-पुरुष विषमता, बालमजुरी, मानवी तस्करी आणि अल्पसंख्याकांवरील अन्याय दिसून येतो. यावरून मानवी हक्कांची घोषणा करणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे यांत मोठे अंतर असल्याचे स्पष्ट होते. हे अंतर कमी करण्यासाठी प्रभावी कायदे, उत्तरदायी प्रशासन, न्यायव्यवस्थेची उपलब्धता आणि नागरिकांमध्ये सामाजिक संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा आदर करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक व सामाजिक कर्तव्य आहे.शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रांत संयुक्त राष्ट्रांच्या विविध विशेषीकृत संस्था महत्त्वाचे कार्य करतात. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना म्हणजेच युनेस्को शिक्षणाचा प्रसार, सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आणि वैज्ञानिक सहकार्य वाढविण्यासाठी प्रयत्न करते. जागतिक आरोग्य संघटना सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी, रोगप्रतिबंधासाठी आणि आरोग्यविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्यासाठी कार्य करते. युनिसेफ बालकांचे आरोग्य, पोषण, शिक्षण आणि संरक्षण यांना प्राधान्य देते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना कामगारांचे हक्क, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि सामाजिक न्याय यांसाठी कार्यरत आहे. निर्वासितविषयक संयुक्त राष्ट्रांचे उच्चायुक्त कार्यालय संघर्ष आणि छळामुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करते. या संस्थांच्या कार्यातून एक महत्त्वाचे तत्त्व स्पष्ट होते की विकास म्हणजे केवळ आर्थिक उत्पादनवाढ नव्हे. प्रत्येक व्यक्तीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा, सुरक्षित निवारा आणि सन्मानजनक रोजगार मिळणे आवश्यक आहे. समाजातील वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेपासून दूर राहिले, तर विकासाची उद्दिष्टे अपूर्ण राहतात.जागतिक आर्थिक विषमता आणि दारिद्र्य ही मानवजातीसमोरील गंभीर आव्हाने आहेत. काही राष्ट्रांनी विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि व्यापाराच्या क्षेत्रांत मोठी प्रगती केली असली, तरी अनेक देशांतील लोकांना अन्न, स्वच्छ पाणी, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. संपत्तीचे केंद्रीकरण, रोजगाराच्या संधींचे असमान वितरण आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव यांमुळे विषमता वाढते. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये शाश्वत विकासासाठी २०३० चा कार्यक्रम स्वीकारला. गरिबीचे निर्मूलन, भूक कमी करणे, आरोग्य सुधारणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे, लैंगिक समानता साध्य करणे, स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे आणि विषमता कमी करणे ही त्यातील महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, हा या कार्यक्रमाचा गाभा आहे. सरकारे, उद्योग, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिक यांच्या समन्वयातूनच ही उद्दिष्टे साध्य होऊ शकतात. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, आदिवासी समुदाय, महिला, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.पर्यावरण संरक्षण आणि हवामानबदल हे आजचे जागतिक प्रश्न आहेत. वाढते तापमान, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांचा परिणाम जगातील विविध देशांवर होत आहे. या संकटांचा सर्वाधिक परिणाम अनेकदा गरीब आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असलेल्या समुदायांवर होतो. भारतासारख्या कृषिप्रधान देशात हवामानातील बदलांचा परिणाम शेती, पशुपालन, पाणीपुरवठा आणि ग्रामीण रोजगारावर होतो. महाराष्ट्रातील दुष्काळी भागांत पाणीटंचाई, पिकांचे नुकसान आणि रोजगाराच्या अभावामुळे ग्रामीण कुटुंबांचे जीवन अस्थिर होते. त्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न केवळ निसर्गाच्या संरक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक न्याय आणि आर्थिक सुरक्षिततेशीही संबंधित आहे. जलसंधारण, जंगलांचे संरक्षण, स्वच्छ ऊर्जेचा वापर, शाश्वत शेती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी हवामानबदलाच्या प्रश्नावर परस्पर सहकार्य करून आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पृथ्वी जतन करणे ही आजच्या पिढीची सामूहिक जबाबदारी आहे.संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात भारताचे योगदानही महत्त्वाचे आहे. भारत हा संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य असून आंतरराष्ट्रीय शांतता, वसाहतवादविरोध, वर्णद्वेषाविरुद्धचा संघर्ष आणि विकसनशील देशांच्या प्रश्नांना जागतिक व्यासपीठावर स्थान मिळवून देण्यासाठी भारताने भूमिका बजावली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये भारताने सैनिक आणि इतर कर्मचारी सहभागी केले आहेत. शांततापूर्ण सहअस्तित्व, संवाद आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या तत्त्वांना भारताच्या परराष्ट्र धोरणात महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय राज्यघटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कविषयक विचारांशी सुसंगत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक लोकशाहीच्या विचारात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या परस्परसंबंधावर भर दिला आहे. समाजातील विषमता दूर करून प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठेने जगण्याची संधी देणे, हे लोकशाहीचे खरे उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि देशांतर्गत सामाजिक न्याय यांचा परस्परांशी जवळचा संबंध आहे. समाजात अन्याय, भेदभाव आणि शोषण कायम असेल, तर शांतता केवळ वरवरची ठरू शकते. न्याय्य आणि समताधिष्ठित समाजरचना ही दीर्घकालीन शांततेची महत्त्वाची पूर्वअट आहे.आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, चुकीची माहिती आणि डिजिटल विषमता यांसारखी नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले असले, तरी त्याचा गैरवापर सामाजिक तणाव आणि असुरक्षितता वाढवू शकतो. अफवा, द्वेषपूर्ण प्रचार, वैयक्तिक माहितीचा गैरवापर आणि सायबर हल्ले यांमुळे व्यक्तींच्या स्वातंत्र्याला आणि समाजाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण, आरोग्य, शेती आणि सार्वजनिक सेवांच्या विकासासाठी झाला पाहिजे; मात्र त्यातून भेदभाव वाढू नये आणि मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. अण्वस्त्रांचा प्रसार, दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी यांवर नियंत्रण मिळविण्यासाठीही राष्ट्रांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची खरी उपयुक्तता मानवी जीवन अधिक सुरक्षित, समृद्ध आणि सन्मानपूर्ण करण्यात आहे.संयुक्त राष्ट्र दिनाचा संदेश केवळ सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांपुरता मर्यादित नाही. प्रत्येक नागरिकाचे वर्तन जागतिक शांतता आणि सामाजिक सलोखा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा राष्ट्रीयत्वाच्या आधारावर इतरांना कमी लेखण्याऐवजी परस्पर आदराची भावना जोपासणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मानवी हक्क, शांतता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण केली पाहिजे. समाजमाध्यमांवर जबाबदारीने वागणे, अप्रमाणित माहिती न पसरविणे, भेदभावाला विरोध करणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे या कृती शांततापूर्ण समाजाच्या निर्मितीस हातभार लावतात. जागतिक शांततेची सुरुवात आंतरराष्ट्रीय परिषदांमधून होत असली, तरी तिचे संवर्धन कुटुंब, शाळा, कार्यस्थळ आणि समाजातील दैनंदिन व्यवहारांतूनही होते. म्हणूनच जागतिक नागरिकत्वाची भावना विकसित करणे आणि स्वतःच्या कृतींचे व्यापक सामाजिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे.२४ ऑक्टोबरचा संयुक्त राष्ट्र दिन आपल्याला भावी पिढ्यांसाठी कोणते जग निर्माण करायचे आहे, याचा विचार करण्याची संधी देतो. युद्ध, द्वेष, विषमता आणि पर्यावरणीय संकटांनी ग्रस्त जग भावी पिढ्यांच्या हाती सोपविण्याऐवजी शांतता, न्याय, समान संधी आणि सहकार्यावर आधारित समाज निर्माण करण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे यश केवळ ठरावांच्या संख्येवर किंवा आंतरराष्ट्रीय परिषदांवर मोजता येणार नाही; तर सामान्य माणसाचे जीवन किती सुरक्षित झाले, किती लोकांना शिक्षण आणि आरोग्यसेवा मिळाली आणि किती समाजांमध्ये न्याय व शांततेची शक्यता निर्माण झाली, यावर ते ठरेल. प्रत्येक राष्ट्राने आपली जबाबदारी ओळखून जागतिक समस्यांच्या निराकरणासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानवजातीचे भविष्य परस्पर द्वेषात नसून सहकार्यामध्ये, युद्धात नसून शांततेमध्ये आणि विषमतेत नसून न्याय्य संधींमध्ये आहे. ‘एक पृथ्वी, एक मानवजात आणि सामायिक भविष्य’ ही भावना केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली, तरच संयुक्त राष्ट्र दिनाचा खरा उद्देश साध्य होईल. जागतिक शांतता, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांसाठीचा सामूहिक संकल्प दृढ करणे, हाच या दिवसाचा सर्वांत महत्त्वाचा संदेश आहे.


**डॉ. राजेंद्र बगाटे**

**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**

**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ ऑक्टोबर २०२६


# आरक्षणाच्या प्रश्नाचा डोळस अन्वयार्थ : 'दलित आरक्षण : भूमिका आणि वाटचाल'




भारतीय समाजव्यवस्थेच्या प्रदीर्घ इतिहासात सामाजिक विषमता हा केवळ भूतकाळाचा विषय नाही; तिचे विविध पदर आजही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात जाणवतात. त्यामुळे आरक्षणाचा प्रश्न हा केवळ नोकरी अथवा शिक्षणातील जागांचा प्रश्न न राहता तो सामाजिक न्याय, समान संधी आणि संविधानिक मूल्यांशी जोडलेला व्यापक विषय ठरतो. अशा संवेदनशील आणि अनेकदा स्फोटक ठरणाऱ्या विषयाकडे विविध अभ्यासकांच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करणारे **'दलित आरक्षण : भूमिका आणि वाटचाल'** हा ग्रंथ म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. **प्रा. डॉ. नारायण कांबळे आणि प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे** यांच्या संपादनाखाली प्रकाशित झालेल्या या ग्रंथात महाराष्ट्रातील सुमारे ४० नामवंत विचारवंत, अभ्यासक-लेखकांनी आरक्षणाच्या विविध पैलूंवर आपली मते मांडली आहेत. **सौरव प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर** यांनी प्रकाशित केलेल्या या ग्रंथाची बांधणी देखणी असून आकर्षक असे मुखपृष्ठ आहे. आरक्षणाची चर्चा अनेकदा राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या चौकटीत अडकते. परिणामी आरक्षणामागील सामाजिक न्यायाची मूलभूत भूमिका बाजूला पडते. या पार्श्वभूमीवर या ग्रंथाचे महत्त्व जाणवते. आरक्षण ही विषम सामाजिक व्यवस्थेत निर्माण झालेल्या ऐतिहासिक असमतोलावर मात करण्यासाठी आवश्यक ठरलेली व्यवस्था आहे, हा या चर्चेचा मूलभूत आधार आहे. महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समता, शिक्षण, प्रतिनिधित्व आणि संधींची समानता यांचा जो विचार मांडला, त्याच वैचारिक परंपरेशी या ग्रंथातील चर्चा जोडलेली दिसते. 'जगा आणि जगू द्या' या मानवतावादी मूल्याच्या व्यापक अर्थाने पाहिले तर आरक्षण हे कोणाच्या हक्कावर अतिक्रमण करण्याचे साधन नसून ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या घटकांना समान संधीच्या प्रवाहात आणण्याचे संविधानिक साधन आहे, ही भूमिका या ग्रंथातून अधोरेखित होते. या ग्रंथाचा सर्वांत महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणजे भारतीय संविधान. संविधानाने प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेची, समानतेची आणि सामाजिक न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे आरक्षणाचा विचार संविधानापासून वेगळा करून करता येत नाही. आरक्षणावरील चर्चा केवळ 'कोणाला किती मिळाले?' या प्रश्नाभोवती फिरण्याऐवजी 'समान संधी प्रत्यक्षात निर्माण झाली आहे का?', 'ऐतिहासिक विषमता कितपत कमी झाली आहे?', 'प्रतिनिधित्वाचे स्वरूप काय आहे?' आणि 'आरक्षणाचा लाभ समाजातील कोणत्या घटकांपर्यंत पोहोचला?' अशा प्रश्नांकडे वळणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून ग्रंथातील विविध लेख आरक्षणाच्या प्रश्नाला व्यापक सामाजिक संदर्भ देतात. आजच्या काळातील आरक्षणाच्या चर्चेत अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. या विषयावर समाजात विविध मतप्रवाह आहेत. एका बाजूला आरक्षणाचा लाभ काही विशिष्ट घटकांपुरता अधिक प्रमाणात केंद्रित झाल्याचा युक्तिवाद केला जातो; तर दुसऱ्या बाजूला अनुसूचित जाती-जमातींच्या अंतर्गत असलेल्या सामाजिक वास्तवाचा विचार करताना व्यापक घटनात्मक चौकट आणि सामाजिक एकात्मता अबाधित ठेवण्याची गरज अधोरेखित केली जाते. या गुंतागुंतीच्या प्रश्नाकडे भावनिक प्रतिक्रिया किंवा घोषणांच्या पलीकडे जाऊन पाहणे आवश्यक आहे. उपवर्गीकरण म्हणजे केवळ प्रशासकीय विभागणी नसून त्यामागे सामाजिक प्रतिनिधित्व, संधींचे वितरण आणि संविधानिक समतेचा प्रश्न आहे. त्यामुळे या विषयावर उपलब्ध आकडेवारी, सामाजिक वास्तव आणि घटनात्मक तरतुदी यांचा परस्परसंबंध तपासणे गरजेचे ठरते. या चर्चेला वैचारिक अधिष्ठान देण्याचे काम या ग्रंथातील लेख करतात. ग्रंथातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनेक लेखांमध्ये नोकरी आणि आरक्षणाच्या लाभाशी संबंधित आकडेवारीचा आधार घेतला आहे. आरक्षणाबाबतच्या चर्चेत आकडेवारीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण केवळ अनुभवकथन, राजकीय भूमिका किंवा भावनिक मांडणी यावरून सामाजिक न्यायाच्या परिणामांचे मूल्यमापन करता येत नाही. आरक्षणाचा लाभ किती लोकांना मिळाला, कोणत्या क्षेत्रात प्रतिनिधित्व किती आहे, कोणते घटक अद्याप मागे आहेत आणि आरक्षणाची उद्दिष्टे प्रत्यक्षात कितपत साध्य झाली आहेत, याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण होणे आवश्यक आहे. त्यामुळे आकडेवारीच्या माध्यमातून आरक्षणाच्या प्रत्यक्ष परिणामांचा वेध घेण्याचा प्रयत्न या ग्रंथाला अधिक अभ्यासपूर्ण बनवतो. या ग्रंथात सुमारे चाळीस अभ्यासक-लेखक सहभागी असल्याने आरक्षणाच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या विविध छटा येथे अनुभवायला मिळतात. प्रत्येक लेखकाची सामाजिक पार्श्वभूमी, अभ्यासाचा विषय आणि वैचारिक भूमिका वेगळी असू शकते. त्यामुळे हा ग्रंथ एखाद्या एकरेषीय निष्कर्षापेक्षा विविध विचारप्रवाहांचा संवाद म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. हेच या ग्रंथाचे बलस्थान आहे. संवेदनशील विषयावर एकच अंतिम मत लादण्याऐवजी विविध प्रश्न, अनुभव, आकडेवारी आणि सामाजिक संदर्भ वाचकांसमोर ठेवले जातात. त्यामुळे वाचकाला स्वतःची भूमिका अधिक चिकित्सकपणे तपासण्याची संधी मिळते. आरक्षणाचा प्रश्न आज समाजमाध्यमांपासून संसद आणि न्यायव्यवस्थेपर्यंत विविध पातळ्यांवर चर्चिला जातो. अनेकदा या चर्चेत तथ्यांपेक्षा गैरसमज, अर्धवट माहिती आणि भावनिक प्रतिक्रिया अधिक प्रभावी ठरतात. अशा वेळी अभ्यासपूर्ण संदर्भ देणारे ग्रंथ समाजासाठी आवश्यक ठरतात. प्रस्तुत ग्रंथ याच कारणामुळे केवळ एका विषयावरील ग्रंथ राहत नाही तो सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा आणि तिच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा विचार करण्यास भाग पाडतो. आरक्षणाची गरज का निर्माण झाली, त्यामागील वैचारिक भूमिका काय आहे, त्याचा लाभ कितपत पोहोचला आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत त्यापुढील आव्हाने कोणती आहेत, यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न येथे दिसतो. या ग्रंथाचे खरे मूल्य कोणत्याही एका निष्कर्षात नसून वाचकाला प्रश्न विचारायला प्रवृत्त करण्यात आहे. आरक्षणाच्या बाजूने किंवा विरोधात भूमिका घेण्यापूर्वी त्याचा सामाजिक इतिहास, घटनात्मक पाया, उपलब्ध आकडेवारी आणि वर्तमानातील बदल समजून घेणे आवश्यक आहे. समाजातील विषमता दूर करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात; त्यासाठी सामाजिक संवेदनशीलता, समान संधी आणि संविधानिक मूल्यांवरील निष्ठा आवश्यक असते. म्हणूनच आरक्षणाचा प्रश्न हा एका समाजघटकाचा प्रश्न न मानता भारतीय लोकशाहीतील सामाजिक न्यायाच्या प्रकल्पाचा भाग म्हणून पाहणे गरजेचे आहे. 'दलित आरक्षण : भूमिका आणि वाटचाल' या ग्रंथाचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. आरक्षणाच्या प्रश्नाकडे डोळसपणे, आकडेवारीच्या आधारे, संविधानिक चौकटीत आणि सामाजिक वास्तवाच्या प्रकाशात पाहण्याची गरज हा ग्रंथ अधोरेखित करतो. मतभेद असतील, प्रश्न उपस्थित होतील, काही मांडणीशी असहमतीही असू शकते; परंतु संवेदनशील प्रश्नावर संवादाची दारे उघडी ठेवणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. आरक्षणाचा प्रश्न हा केवळ आरक्षित जागांचा प्रश्न नाही; तो समान संधी, सामाजिक प्रतिष्ठा आणि संविधानाने दिलेल्या न्यायाच्या आश्वासनाचा प्रश्न आहे. त्यामुळे या विषयावर भावनिक ध्रुवीकरणाऐवजी अभ्यासपूर्ण आणि विवेकशील संवादाची गरज आज अधिक आहे. त्या संवादासाठी संदर्भसंपन्न व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा ग्रंथ म्हणूनच वाचकांनी गंभीरपणे पाहावा, असा आहे.


**प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे,**
**कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,**
**बाभळगाव, लातूर**






**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.